# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | तपशील | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | **पीक/वाणाचे नाव** | **कापूस : एनएचएच ४४** |
| २ | **प्रसारीत केल्याचे वर्ष** | १९८४ |
| ३ | **प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ** | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | **जमीन** | मध्यम ते काळी, खोल |
| ५ | **हवामान** | उष्ण ते समशीतोष्ण, उबदार |
| ६ | **पेरणी/लागवडीचा कालावधी** | बागायती : २५ मे - ७ जून<br>कोरडवाहू : ७० - ८० मिमी पाऊस पडल्यानंतर<br>(१५ जुलैच्या अगोदर) |
| ७ | **प्रती एकर बियाणे** | बागायती : १ - १.२ कि.ग्रॅ. प्रती एकर<br>कोरडवाहू : १.२ - १.६ कि.ग्रॅ. प्रती एकर |
| ८ | **पीक व्यवस्थापन** | |
| | **१ लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन** | बागायती लागवड २५ मे नंतर करावी तर कोरडवाहू लागवड मॉन्सूनचा ७० ते ८० मिमी. पाऊस पडल्यानंतर करावी. कापसाची लागवड १५ जुलैनंतर करू नये.<br>**लागवडीचे अंतर :**<br>बागायती - ९० X ९० सेंमी किंवा १२० X ९० सेंमी<br>कोरडवाहू - ९० X ६० सेंमी |
| | **२ खत व्यवस्थापन** | बागायती - १००:५०:५० किग्रॅ नत्र, स्फुरद व पालाश / हेक्टर<br>कोरडवाहू - ८०:४०:४० किग्रॅ नत्र, स्फुरद व पालाश / हेक्टर<br>संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीच्या वेळी द्यावी. नत्राची मात्रा बागायतीमध्ये लागवडीच्या वेळी, १ व २ महीन्यानंतर अनुक्रमे २०%, ४०% व ४०% प्रमाणात द्यावे. कोरडवाहू लागवडीमध्ये नत्र लागवडीच्या वेळी व १ महीन्यानंतर प्रत्येकी ५० % या प्रमाणात द्यावे. |
| | **३ पाणी व्यवस्थापन** | बागायती लागवडीमध्ये पाऊस पडे पर्यंत जमिनीच्या मगदुरानुसार ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. पीक वाढीच्या काळात पाऊसाचा खंड असल्यास पाते- फुले लागणे, बोंडे लागणे व बोंडे भरण्याच्या अवस्थेत पाणी द्यावे. |
| | **४ कीड व्यवस्थापन** | **रस शोषण करणाऱ्या किडी** (मावा, तुडतुडे व फुलकिडे)<br>व्यवस्थापन - निंबोळी अर्क ५% किंवा असिटामिप्रिड २५ एसपी २ ते ४ ग्रॅम किंवा थायमिथॉक्झाम २५ डब्ल्युजी २.५ ग्रॅम किंवा फ्लोनिकामीड ५० डब्ल्युजी ४ ग्रॅम<br>पांढरी माशी – ट्रायझोफॉस ४० ई सी १६-२० मिली किंवा ॲसिफेट ७५ एसपी ३० ग्रॅम किंवा डायफेन्थ्युरॉन ५० डब्ल्युजी ८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ग्रॅम<br>**अळी :** ठिपक्याची बोंडअळी, हिरवी बोंडअळी, शेंदरी बोंडअळी व पाने खाणारी अळी<br>व्यवस्थापन- कार्बारील ५०% भुकटी ४० ग्रॅम किंवा प्रोफेनोफॉस ५० ईसी २० मिली किंवा थायोडीकार्ब ७५ डब्ल्युपी २० ग्रॅम किंवा स्पिनोसॅड ४५ एससी ४ मिली किंवा ईंडोक्झाकार्ब १४.५ ईसी १० मिली.<br>कीटकनाशकाचे प्रमाण प्रती १० लीटर पाणी नॅपसॅक पंपासाठी. पावर स्प्रेअरसाठी प्रमाण ३ पट वापरावे. |
| | ५ | **रोग व्यवस्थापन** | दहिया- गंधक ३०० मेश भुकटी २० किग्रॅ / हेक्टर धुरळणी किंवा कार्बेन्डेझीम १० ग्रॅम प्रती १० ली.<br>मर रोग- कॉपर ऑक्झीक्लोराईड २५ ग्रॅम प्रती १० ली. प्रमाणात आळवणी<br>बुरशीजन्य करपा- सुडोमोनास फ्लुरोसन्स ०.२ टक्के फवारणी |
| **९** | **पिकाचा कालावधी** | | १६०-१७० दिवस |
| **१०** | **उत्पादकता** | | बागायती : २२ - २३ क्विं. / हे. (८.८ - ९.२ क्विं. / एकर)<br>कोरडवाहू : १० - १२ क्विं. / हे. (४ - ६ क्विं. / एकर) |
| **११** | **वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म** | | १. पुनर्बहार क्षमता<br>२. विविध हंगामात उत्पादनामध्ये सातत्य<br>३. रस शोषण करणा-या किडींना सहनशील<br>४. कोरडवाहू तसेच बागायतीसाठी उपयुक्त |
| **१२** | **वाणासंबंधीचे छायाचित्रे** | |  |